# 8 विभाज्यता

2UJFZB

## जरा आठवूया.

- विभाज्यतेची 2 ची कसोटी, 5 ची कसोटी व 10 ची कसोटी लिहा.
- खालील संख्या वाचा. त्यांपैकी कोणत्या संख्या 2 ने, 5 ने किंवा 10 ने विभाज्य आहेत ते ओळखून रिकाम्या चौकटींत लिहा.

125, 364, 475, 750, 800, 628, 206, 508, 7009, 5345, 8710

| 2 ने विभाज्य | 5 ने विभाज्य | 10 ने विभाज्य |
|---|---|---|
| | | |

## जाणून घेऊया.

### विभाज्यतेच्या कसोट्या (Tests of Divisibility)

आणखी काही कसोट्यांचा अभ्यास करू.

खालील सारणी पूर्ण करा.

| संख्या | संख्येतील अंकांची बेरीज किती ? | बेरजेला 3 ने भाग जातो का? | दिलेली संख्या 3 ने विभाज्य आहे का ? |
|---|---|---|---|
| 63 | 6 + 3 = 9 | ✓ | ✓ |
| 872 | 17 | × | × |
| 91 | | | |
| 552 | | | |
| 9336 | | | |
| 4527 | | | |

यावरून काय निष्कर्ष काढता येईल ?

**हे मला समजले.**

**3 ची विभाज्यतेची कसोटी : जर कोणत्याही संख्येतील अंकांच्या बेरजेला 3 ने नि:शेष भाग जात असेल, तर ती संख्या 3 ने विभाज्य असते.**

## जाणून घेऊया.

खालील सारणी पूर्ण करा.

| संख्या | दिलेल्या संख्येला 4 ने भागून पाहा. पूर्ण भाग जातो का ? | दशक व एककस्थानच्या अंकांनी तयार झालेली संख्या | तयार झालेली संख्या 4 ने विभाज्य आहे का ? |
|---|---|---|---|
| 992 | ✓ | 92 | ✓ |
| 7314 | | | |
| 6448 | | | |
| 8116 | | | |
| 7773 | | | |
| 3024 | | | |

यावरून काय निष्कर्ष काढता येईल ?

## हे मला समजले.

**4 ची विभाज्यतेची कसोटी : जर कोणत्याही संख्येतील दशक व एककस्थानच्या अंकांनी तयार होणाऱ्या संख्येला 4 ने नि:शेष भाग जात असेल, तर ती संख्या 4 ने विभाज्य असते.**

## जाणून घेऊया.

खालील सारणी पूर्ण करा.

| संख्या | दिलेल्या संख्येला 9 ने भागून पाहा. पूर्ण भाग जातो का ? | संख्येतील अंकांची बेरीज | बेरीज 9 ने विभाज्य आहे का ? |
|---|---|---|---|
| 1980 | ✓ | 1 + 9 + 8 + 0 =18 | ✓ |
| 2999 | × | 29 | × |
| 5004 | | | |
| 13389 | | | |
| 7578 | | | |
| 69993 | | | |

यावरून काय निष्कर्ष काढता येईल ?

**हे मला समजले.**

**9 ची विभाज्यतेची कसोटी :** **जर कोणत्याही संख्येमधील अंकांच्या बेरजेला 9 ने नि:शेष भाग जात असेल, तर ती संख्या 9 ने विभाज्य असते.**

## सरावसंच 22

1. एका बागेत फुलझाडे आहेत. एकेका झाडावर एकच संख्या असलेली अनेक फुले आहेत. तीन विद्यार्थी परडी घेऊन फुले तोडायला गेले. परडीवर 3, 4, 9 यांपैकी एक संख्या आहे. प्रत्येक विद्यार्थी आपल्या परडीवरील संख्येने विभाज्य संख्या असलेले फूल तोडतो. एका झाडावरून एकच फूल तो घेतो. सांगा बरं ! प्रत्येक परडीत कोणत्या संख्यांची फुले असतील ?

